*एफ. वाय. बी. ए. (सेमिस्टर – १ )*
*विषय : मराठी साहित्य : कथा आणि भाषिक कौशल्यविकास*

*प्रा. डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी*
*एम.ए.नेट, सेट, पीएच. डी.*
*(मराठी विभागप्रमुख, सिन्नर महाविद्यालय)*

## घटक - ३) भाषिक कौशल्यविकास

### नैसर्गिक आकलनासह श्रवण कौशल्य :

#### अ) श्रवण आणि श्रवण कौशल्याच्या व्याख्या

- शाब्दिक किंवा अशाब्दिक उद्दीपकांद्वारे सूचित अर्थांचे ग्रहण करणे म्हणजे 'श्रवण' होय.
- बोलणाऱ्या व्यक्तीने उच्चारलेल्या भाषेतील शब्द व अर्थ यातून सूचित होणार विचार समजून घेणे म्हणजे 'श्रवण' होय.
- शाब्दिक किंवा अशाब्दिक संदेशातून मिळणाऱ्या माहितीचे किंवा विचारांचे आकलन करण्याची प्रक्रिया म्हणजे 'श्रवण' होय.
- श्रवण म्हणजे बोलली जाणारी भाषा व त्या भाषेतील शब्द व वाक्ये यांचा अर्थ समजणे.
- मौखिक संभाषण समजून घेण्याची व त्याला अनुसरून परिणामकारक प्रतिसाद देण्याची कुवत ज्यामुळे निर्माण होते, ते श्रवणकौशल्य होय.
- मौखिक संज्ञांना अर्थ प्राप्त करून देण्याची क्रिया ज्यामुळे घडते, ते श्रवण कौशल्य होय.

## ब) श्रवण कौशल्याचे स्वरूप

श्रवण हे भाषिक कौशल्यांमधील पायाभूत कौशल्य आहे. अर्थात् पायाभूत कौशल्य जेवढे अधिक चांगले तेवढे त्यावर आधारित इतर कौशल्ये प्रभावी ठरतील. बोलता न येणारे लहान मूल श्रवणातूनच भाषेतील शब्द, शब्दसमूह, वाक्यांची रचना ओळखते व नंतर आत्मसात करून त्यांचा वापर करू लागते. हा अनुभव भाषा विकासातील श्रवणखौशल्याचे महत्त्व अधोरेखित करतो. बहिरेपणा नसलेल्या व्यक्तींपैकी प्रत्येकजण श्रवण करू शकतो; असे असले तरी फारच थोड्या लोकांकडून दर्जेदार श्रवण घडते. संशोधनाने असेही सिधअद झालेले आहे की, ब-याच व्यक्तींमध्ये श्रवणक्षमता अल्प प्रमाणात व निकृष्ट दर्जाची असते. यावरून असे म्हणता येईल की, श्रवणक्षमता निसर्गदत्त असली तरी श्रवणकौशल्य मात्र प्रयत्नाने आत्मसात करावे लागते. केवळ एकता येते म्हणजे श्रवण करता येते असे नाही.

श्रवणप्रक्रिया गुंतागुंतीची असल्यामुळे श्रण केलेल्यापैकी केवळ एक दशांशच भाग लक्षात राहतो. त्यामुळे जे एकले ते सर्वच जशाचे तसे लक्षात ठेवणे अपेक्षित नसते. बोवणा-याच्या विचारांचा सारांश मर्यादित वेळेत करता येणे हा देखील श्रवण कौशल्याचा महत्त्वाचा भाग ठरतो. बोलणा-याला तीच गोष्ट पुन्हा सांगण्याची वेळ जो येऊ देत नाही त्याचे श्रवणकौशल्य चांगले आहे असे समजावे. कारण बोलणा-याची वेळ आणि शक्ती त्यामुळे वाचविली जाते.

श्रवण कौशल्यामध्ये शाब्दिक व अशाब्दिक उद्दीपकांना महत्त्व आहे. श्रोत्यांची इच्छाशक्ती, उद्दीपकांमधील भेद लक्षात घेण्याची क्षमता, ऐकलेल्या माहितीवरून व विचारांतून तार्किक अनुमान व निष्कर्ष काढण्याची क्षमता, आकलन सुलभता, दुसऱ्याचे

ऐकून घेण्याची मानसिकता यावर श्रवण कौशल्यांचा विकास अवलंबून आहे. यामुळे परस्परांशी उत्तम संवाद साधता येतो. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व कार्यालयीन स्तरावर परिणामकारक जीवन जगता येते.

## क ) श्रवण कौशल्य विकसित करणारी तत्त्वे :

- ✓ मनाची एकाग्रता विकसित करणे.
- ✓ अवधान देऊन ऐकणे.
- ✓ बोलणाऱ्याचे विचारातील आशय समजून घेणे.
- ✓ आकलन झालेल्या माहितीवर सकारात्मक विचार करणे.
- ✓ एकदम निष्कर्षाप्रत न पोहचता विचारपूर्वक प्रतिसाद देणे.
- ✓ पूर्वग्रह व गृहीतकृत्य लक्षात घेऊन श्रवण न करणे.
- ✓ शाब्दिक व अशाब्दिक उद्दीपकांमधील फरक ओळखणे.
- ✓ ऐकताना स्तब्धता व संयम राखणे, एखादा विचार पूर्ण श्रवण केल्यावरच प्रतिसाद देणे.
- ✓ श्रवण करताना ऐकणाऱ्याने विवेकाचा स्वीकार करावा. एखादी गोष्ट आवडली नाही तर त्यास विवेक वृत्तीने प्रतिसाद द्यावा म्हणजे संघर्ष टाळता येतो.
- ✓ प्रकटीकरणाच्या शैलीपेक्षा विषयाकडे लक्ष देणे.
- ✓ श्रवणात येणा-या प्रक्षोभक शब्दांवर विजय मिळविणे.

## ड ) श्रवण कौशल्यातील अडचणी :

- ❖ दोन व्यक्तींमध्ये काही कारणाने ध्वनींचे वहन योग्य प्रकारे होत नसेल, तर श्रवणप्रक्रियेत अडथळा निर्माण होतो.
- ❖ बोलणारा जर जास्त गतीने किंवा फार कमी गतीने बोलत असेल, तर श्रवणात अडथळा येतो.
- ❖ बोलणा-याच्या उच्चारात दोष असेल तर ऐकणारा परिणामकारकपणे श्रवण करू शकत नाही.
- ❖ ऐकणाराने बोलणा-याचा विषय स्वत:ला न आवडणारा असल्याचा गैरसमज करून घेतल्यास श्रवणक्रिया व्यवस्थित होऊ शकत नाही.
- ❖ ऐकणारा कधीकधी बोलणा-याच्या विषयापेक्षा बोलणा-याचेच मूल्यमापन करण्यात अकडून पडतो. त्यामुळे श्रवण चांगले होऊ शकत नाही.
- ❖ कधीकधी ऐकणा-याकडून जाणीवपूर्वक श्रवण करीत असल्याचा फक्त देखावा केला जातो, प्रत्यक्षात मात्र ऐकत असतांना तो वेगळ्याच विचारांमध्ये हरवलेला असतो.
- ❖ अपरिचित विषयावर वक्ता वोलत असेल तर ऐकणारा श्रवणोत्सुक नसतो.
- ❖ काही लोकांना अगदी शुल्लक कारणानेही लक्ष विचलित करण्याची सवय असते. त्यामुळेही श्रवणात अडचण निर्माण होते.

## इ ) श्रवण कौशल्याचे फायदे :

- व्यक्तिमनाचा सकारात्मक विकास होतो.
- परस्परांशी उत्तम संवाद साधता येतो.
- सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कार्यालयीन स्तरावर चांगल्या श्रवण कौशल्यामुळे परिणामकारक जीवन जगता येते.
- आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी होते.
- इतरांचे विचार व त्यांच्या समस्या त्यांच्या भूमिकेतून समजून घेण्याची क्षमता विकसित होते.
- ध्येय समजून घेणे व ध्येयाची पूर्तता करणे.
- कौटुंबिक संवादातून कुटुंबाला एकत्र ठेवणे.
- अध्ययन परिणामकारक करता येते.